| | |
|---|---|
| दावा दाखल तारीख | ०१/०१/२०१० |
| दावा फैल तारीख | ०२/०१/२०१० |
| निकाल तारीख | १९/१०/२०१८ |
| प्रलंबन कालावधी **०८ वर्षे०९महिने १८दिवस** | |

# सांगली येथील तिसरे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

(पीठासीन अधिकारी **विनोद रा. पाटील**)

## नियमित दिवाणी दावा क्रमांकः–३/२०१०

**(CNR No.:-MHSN02-000011-2010)**

**निशाणी क्रमांकः–**

श्री.राजेंद्र बसाप्पा अलगुर,
वयः ३० वर्षे धंदाः फॅब्रीकेशन चालक व मालक,
राहणारः महसूल कॉलनी, शामराव नगर,
सांगली. ....**वादी**

**विरुध्द**

१. मा.उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लि.
दक्षिण उपविभाग, हिराबाग कॉर्नर,
खणभाग, सांगली.

२. मा.आरोग्य अधिकारी,
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका, राजवाडा चौक, सांगली..... **प्रतिवादी**

**दावाः-<u>निरंतर मनाईकरिता व हक्कज्ञापनाकरिता...</u>**

**वादींतर्फे विद्वान वकीलः श्री.पी.एम.खोत.**
**प्रतिवादी क्रमांक १ तर्फे विद्वान वकीलः श्री.यु.जे.चिप्रे.**
**प्रतिवादी क्रमांक २ तर्फे विद्वान वकीलः श्री.एस.ए.भोसले.**

# न्या य नि र्ण य

## (घोषीत तारीख १९/१०/२०१८)

वादीने निरंतरच्या मनाईसाठी व हक्कज्ञापनासाठी प्रस्तुतचा दावा दाखल केला आहे.

<u>वादीचा दावा थोडक्यात पुढीलप्रमाणे</u>-

२. वादी हा सुशिक्षीत बेरोजगार युवक असून वित्तीय संस्थांचे कर्ज काढून व लागणारे सर्व परवाने घेवून त्याने 'रियल फॅब स्टील फर्निचर व वेल्डींग' या नावाने फॅब्रीकेशनचा व्यवसाय सुरु केलेला आहे. त्या व्यवसायाच्या उत्पन्नातून वादी कुटूंबाची उपजिवीका करीत आहे. सांगली येथील सर्व्हे नं.४८२/१+२ मधील प्लॉट क्र.९ मध्ये वादीचा व्यवसाय सुरु असून प्रतिवादी क्र.२ महानगरपालिकेचा परवाना क्र.४/६/७१६/२००८-०९ हा असून त्यासाठी सर्व कायदेशीर प्रक्रिया पार पाडून त्या व्यवसायाच्या अनुज्ञप्तीसाठी रक्कम रु.६००/- वादीने भरलेले आहेत. परवान्याची मुदत दि.३१.०३.२०१० पर्यंत आहे. त्यासाठी प्रतिवादी क्र.१ ला वादी यांच्या वाणीज्य वापरासाठी ८ अश्वशक्तीचा वीज जोड घेतला असून त्याचा विद्युत ग्राहक क्रमांक

२७९९४०८१७६४६ असा आहे. तथापी काही विघ्नसंतोषी लोक वादीस त्रास देण्यासाठी वादीचेविरुध्द बेकायदेशीर कारवाई करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांनी प्रतिवादी क्र.२ चे कार्यालयातील अधिका–यांना हाताशी धरुन कोणतीही चौकशी न करता प्रतिवादी क्र.२ ने दि.२४.१२.२००९ रोजी बेकायदेशीर पत्र पाठवले व वादीचा व्यवसाय बंद करणेस सांगितले. तसेच त्यांनी कोणत्याही चौकशीशिवाय दि.२४.१२.२००९ रोजी प्रतिवादी क्र.१ यांना नोटीस पाठवून वादीचे व्यवसायाचा विद्युत पुरवठा खंडीत करण्याबाबत कळविले. प्रतिवादींची सर्व कार्यवाही ही अनुचित व बेकायदेशीर आहे. प्रतिवादी क्र.२ च्या सांगणेवरुन प्रतिवादी क्र.१ ने वादीचा व्यवसायीक विद्युत पुरवठा खंडीत केल्यास वादीचा व्यवसाय बंद होवून त्याचे अपरिमीत नुकसान होणार आहे. सबब वादीचा व्यवसायीक विद्युत पुरवठा खंडीत करु नये व प्रतिवादी क्र.२ ने वादीचा व्यवसाय बंद करणेकरिता चालवलेली कार्यवाही बेकायदेशीर आहे असे हक्कज्ञापन होवून मिळणेसाठी वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे.

३. प्रतिवादी क्र.१ ने हजर होवूनही मुदतीत दाव्यास कैफियत दाखल केली नाही.

४. प्रतिवादी क्र.२ यांनी नि.क्र.३६ कडे दाव्यास कैफियत दाखल केलेली आहे. त्यांनी वादीच्या दाव्याची कथने अमान्य केली आहेत. प्रतिवादींनी वादीस व्यवसायासाठी परवाना दिल्याची वस्तुस्थिती मान्य केली आहे. मात्र व्यवसायाचे ठिकाणी ग्राईंडर वापरणास असलेबाबत वस्तुस्थिती लपवून ठेवून वादीने सदरील

परवाना प्राप्त करुन घेतल्याची वस्तुस्थिती नमुद केलेली आहे. त्याने त्याच्या कैफियतीमध्ये पुढे असेही नमुद केले आहे की, दि.२६.०६.२००८ रोजी महसूल कॉलनी, शामराव नगर येथे नागरिकांनी व्यवसायापासून त्यांच्या आरोग्यास धोका व उपद्रव होत असल्याची लेखी तक्रार प्रतिवादीकडे दिली. सदरील तक्रारीच्या आधारे चौकशी केली असता वादीने त्या व्यवसायासाठी महानगरपालिकेचा परवाना घेतल्याचे आढळ न झाल्याने दि.१३.०१.२००८ रोजी वादीस रितसर नोटीस दिली. त्यानंतरही वादीने त्याचा व्यवसाय बंद न केल्याने व त्या अनुषंगाने नागरिकांच्या तक्रारी प्राप्त झाल्याने दि.२२.१०.२००८ रोजी विद्युत पुरवठा खंडीत का करु नये, अशी नोटीस पाठवून दि.३१.०२.२००८ रोजी विद्युत पुरवठा खंडीत करणेत आला. तसेच दि.११.०६.२००८ रोजी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेकडून त्याठिकाणी प्रत्यक्ष ध्वनीतिव्रता चाचणी घेतली असता ध्वनीप्रदुषण होत आहे असे निदर्शनास आले. त्यानंतर दि.२०.०८.२००९ रोजी व्यवसायाचे ठिकाणची यंत्रसामुग्रीची तपासणी केली असता ग्राईंडरच्या आवाजाने तीव्र ध्वनीप्रदुषण होत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे वादीस दिलेला महानगरपालिकेचा परवाना रद्द करणेत आला. सबब वादींचा दावा अमान्य करणेची त्यांनी विनंती केली.

५. वादीने त्याच्या दाव्याच्या पृष्टयर्थ त्याचे सरतपासाचे शपथपत्र नि.क्र.१२५ कडे दाखल केले. तसेच तोंडी पुराव्याच्या पृष्टयर्थ सांगली, मिरज, कुपवाड महानगरपालिका यांचेकडील लायसन्स रजिस्टरचा लायसन्स क्र.७१६ चा उतारा (नि.क्र.१४४), वादीचा अर्ज (नि.क्र.१४५), वादी यांना नाहरकत

दाखला देणेबाबतचा अभिप्राय (नि.क्र.१४६), जाहीर नोटीस (नि.क्र.१४७), जाहीर नोटीस दैनिक ललकार मध्ये प्रसिध्द केलेबाबत कागद (नि.क्र.१४८), अर्जासोबतची दि.०४.०४.२००८ ची टिप्पणी (नि.क्र.१४९), दि.२९.०५.२००७ चा नाहरकत दाखला (नि.क्र.१५०), स्वच्छता निरिक्षक सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका यांचा रिपोर्ट (नि.क्र.१५१), सर्वसाधारण पावती (नि.क्र.१५२), इ.कागदपत्रे दाखल केले आहेत.

६. प्रतिवादी क्र.२ तर्फे वैद्यकीय अधिकारी डॉ.कवठेकर यांचा पुरावा (नि.क्र.१५६) दाखल केला आहे. सदर साक्षीदाराच्या साक्षीच्या पृष्टयर्थ वादी यांना दिलेली नोटीस (नि.क्र.१५७), नागरिकांची तक्रार असलेला अर्ज (नि.क्र.१५८) व (नि.क्र.१५९), एम.ई.सी.बी. यांना दिलेले पत्र (नि.क्र.१६०), एम.एस.ई.बी. ने तपासणी केलेला दाखला (नि.क्र.१६१), त्याबाबत महानगरपालिकेने केलेली कार्यवाही (नि.क्र.१६२), इ. कागदपत्रे दाखल केली आहेत.

७. प्रतिवादी क्र.१ ने पुरावा दाखल केला नाही.

८. या वादपत्राचे अंतिम निर्णयासाठी माझ्या पुर्वाधिका-यांनी नि.११५ कडे काढलेले मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष पुढीलप्रमाणे;

| अ.क्र | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रतिवादी क्र.२ ने वादीविरुध्द सुरु केलेली कार्यवाही बेकायदेशीर असल्याचे वादीने शाबीत | ..होकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| | केले आहे काय? | |
| २. | वादी विनंतीप्रमाणे हक्कज्ञापनाचा अनुतोष मिळणेस पात्र आहे काय? | ..नकारार्थी. |
| ३. | वादी निरंतरच्या मनाईचा अनुतोष मिळणेस पात्र आहे काय? | ..नकारार्थी. |
| ४. | आदेश व हुकूमनामा काय? | .. अंतिम आदेशाप्रमाणे |

# कारणमीमांसा

**मुद्दा क्रमांक १ बाबतः-**

९. वादीने त्याचे पुराव्याचे शपथपत्र (नि.क्र.१२५) व प्रतिवादी क्र.२ तर्फे वैद्यकीय अधिकारी डॉ.कवठेकर यांचे शपथपत्र (नि.क्र.१५६) दाखल केले आहे. वादीचा सर्व्हे नं.४८२/१+२ मधील प्लॉट क्र.९ मध्ये 'रियल फॅब स्टील फर्निचर व वेल्डींग' या नावाने फॅब्रीकेशनचा व्यवसाय आहे, त्यास परवाना क्र.४/६/७१६/२००८-०९ प्रमाणे परवाना दिलेला आहे. त्याठिकाणी व्यवसायासाठी वादीने वीजजोड घेतला असून त्याचा क्रमांक २७९९४०८१७६४६ असा आहे, तसेच आरोग्य विभागाचा परवाना घेतलेला आहे, ही वस्तुस्थिती वादी व प्रतिवादींना मान्य आहे. वादीच्या व्यवसायाच्या परवान्यासाठी वादीने प्रतिवादी क्र.२ च्या जरुर त्या विभागाचे नाहरकत दाखले घेतलेले आहेत हे उभय पक्षांना मान्य आहे.

१०. वादीचा व्यवसाय त्या ठिकाणी सुरु झाल्यानंतर स्थानिक व्यक्तींनी ध्वनी प्रदुषणाच्या तक्रारी महानगरपालिकेकडे दाखल केलेल्या आहेत.

याबाबतही वादी प्रतिवादींमध्ये मतभेद नाही. प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र.२ ने वादीच्या व्यवसायाचा परवाना रद्द करणेसाठी केलेली कार्यवाही उचीत आहे किंवा कसे एवढाच या न्यायालयासमोर वादाचा मुद्दा आहे.

११. प्रस्तुत प्रकरणामध्ये अभिलेखावरील दस्तऐवज पाहिले. वादी व्यवसायाचा परवाना मिळणेसाठी दाखल केलेला अर्ज (नि.क्र.१४५) पडताळला. त्यामध्ये वादीने वेल्डींग मशीन, ड्रील मशीन व ग्राईंडींग मशीन यासाठी परवाना मागितलेला आहे. प्रतिवादीतर्फे युक्तीवाद करताना वादीने ग्राईंडर मशीनच्या वापराची बाब परवाना घेताना लपवून ठेवून व्यवसायीक परवाना घेतलेला आहे, वादीचा अर्ज (नि.क्र.१४५) पाहिला. त्यामध्ये ग्राईंडींग मशीनचा उल्लेख आहे. तो प्रतिवादी क्र.२ चे अधिका-यांनी पाहिला नाही ही संभावना वाटत नाही. प्रतिवादींनी जाहीर केलेली नोटीस (नि.क्र.१४७) पाहिली. त्यावर महसुल कॉलनीतील नागरिकांचे नाहरकत असल्याच्या सह्या आहेत. तसेच स्वच्छता निरिक्षक सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.०४.०४.२००८ (नि.क्र.१४९) ची टिप्पणी पाहिली. त्यामध्ये स्वच्छता निरिक्षकांनी वादीस नाहरकत दाखला दिलेला आहे. तसेच सांगली, मिरज, कुपवाड शहर महानगरपालिकेने दिलेला नाहरकत दाखला (नि.१४९) पाहिला. त्यामध्ये वादीस सदरचा व्यवसाय करणेस परवानगी दिल्याचा नाहरकत दाखला दिलेला आहे. यावरुन महानगरपालिकेच्या विविध विभागांनी वादीस व्यवसाय करण्यासाठी परवानगी दिली होती व त्याप्रमाणे व्यवसायाचा परवाना दिला असल्याचे स्पष्ट होते.

१२. प्रतिवादी क्र.२ तर्फे असे कथन करणेत आले की, काही नागरिकांनी वादीच्या व्यवसायाबाबत हरकती घेतल्या व त्यांनी ध्वनीप्रदुषणाचा त्रास होत असल्याचे सांगितले. प्रतिवादीतर्फे श्री.कवठेकर यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.१८.०८.२००९ रोजी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रक मंडळ, सांगली यांना पत्र पाठवून हवेतील ध्वनी तिव्रता तपासणेची विनंती केलेली आहे. तसेच नि.क्र.१५९ कडील अर्ज पाहिले. त्यामध्ये वादीचे व्यवसायामुळे ध्वनी तिव्रता वाढत असून त्यांनी तो व्यवसाय बंद करावा अशी विनंती केल्याचे दिसून येते. वादीच्या व्यवसायामुळे ध्वनी प्रदुषण होते अशी तक्रार प्राप्त झाल्यानंतर तेथील ध्वनी तिव्रता तपासण्याची जबाबदारी तज्ञ म्हणुन उपप्रादेशीक अधिकारी, महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रक मंडळ यांची आहे. प्रतिवादी क्र.२ ने दि.१८.०८.२००९ तसेच दि.२४.०६.२००९ रोजी पत्रे पाठवून ध्वनी तिव्रता तपासणेबाबत विनंती केली आहे. महाराष्ट्र राज्य प्रदुषण नियंत्रक मंडळ यांचे दि.२०.०८.२००९ व दि.०६.०८.२००९ रोजी तपासणी केल्याचे अहवाल अभिलेखावर आहेत. त्यानुसार दिलेले अहवाल पाहिले. त्यामध्ये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रक मंडळाला ध्वनी तिव्रता तपासताना संबंधीत अधिका–यांनी वादीचा व्यवसाय ज्या ठिकाणी सुरु आहे त्याठिकाणी प्रत्यक्ष भेट देवून मशीन सुरु होण्यापुर्वी ध्वनीची तीव्रता व मशीन सुरु झाल्यानंतर येणारी हवेतील तिव्रता या दोन्ही बाबी वेगवेगळ्या पध्दतीने तपासणे गरजेचे होते व त्यानंतर त्यांचा सविस्तर अहवाल महानगरपालिकेकडे पाठविणे अपेक्षीत होते. मात्र, तसा अहवाल त्यांनी पाठवल्याचे दिसत नाही. उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र महाराष्ट्र प्रदुषण मंडळ यांनी पाठवलेला अहवाल (नि.क्र.१५१) हा संदिग्ध

स्वरुपाचा आहे. त्या अहवालाच्या आधारे प्रतिवादी क्र.२ ने वादीचा परवाना रद्द करण्याची कार्यवाही सुरु केलेली आहे.

१३. प्रतिवादीतर्फे युक्तीवाद करताना प्रतिवादी क.२ ने दिलेला कोणताही परवाना रद्द करणेचा अधिकार प्रतिवादी क्र.२ ला आहे असा युक्तीवाद करणेत आला. प्रतिवादी क्र.२ ही स्थानिक स्वराज्य संस्था आहे. चुकीच्या पध्दतीने एखादा परवाना दिला असेल अथवा परवाना दिलेनंतर त्यामुळे नियम भंग होत असेल अथवा परवाना धारकाने त्या परवान्याचे आधारे नियम भंग केला असेल तर प्रतिवादी क्र.२ ला तो रद्द करणेचा अधिकार प्रतिवादी क्र.२ यांना आहे. मात्र तत्पुर्वी ज्या लोकांची तक्रार प्रतिवादींनी ऐकून घेतली, त्याचप्रमाणे प्रतिवादीने वादींचे म्हणणे ऐकून घेवून तक्रारीची रितसर चौकशी होवून त्याबाबत निर्णय होणे अपेक्षीत होते. मात्र या ठिकाणी कोणत्या अधिका–यांनी कोणत्या प्रकारे चौकशी केली याबाबतचा पुरावा प्रतिवादी क्र.२ यांनी दिलेला नाही. प्रतिवादी क्र.२ चे कृत्य हे मनमानी स्वरुपाचे आहे. ते नैसर्गिक न्याय तत्वाचे विरुध्द आहे. प्रस्तुत तक्रारीच्या वेळी जे अधिकारी कार्यरत होते व ज्यांनी त्या तक्रारीची चौकशी केली ते अधिकारी सध्या महानगरपालिकेच्या सेवेमध्ये कार्यरत असताना त्यांचा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. अशा सिथतीमध्ये महानगरपालिकेचे कृत्य हे नैसर्गिक न्यायाचा विचार करुन केलेले नाही. त्यामुळे ती कृती बेकायदेशीर आहे हे सिध्द होते. सबब मुद्दा क्र.१ बाबत माझा अभिप्राय होकारार्थी आहे.

**<u>मुद्दा क्र.२ व ३ बाबतः–</u>**

१४. मुद्दा क्र.१ बाबतचा अभिप्राय होकारार्थी आलेला आहे. प्रतिवादी क्र.२ ने वादीचा परवाना रद्द करण्यासाठी केलेली कार्यवाही उचित नाही असा निष्कर्ष उपरोक्त विवेचनावरुन आलेला आहे. अशा स्थितीमध्ये वादी हक्कज्ञापनाची व निरंतरच्या मनाईची दाद मिळणेस पात्र आहेत काय हे पाहणे संयुक्तीक ठरेल.

१५. वादीस प्रतिवादीने दिलेला व्यवसायाचा परवाना दि.३१.०३.२०१० पर्यंत होता. त्यानंतर वादीने त्या परवान्याचे नुतणीकरण केलेले नाही. वादीने ज्या परवान्यासाठी हक्कज्ञापन मागितलेले आहे तो सध्या अस्तीत्वात नाही. नुतणीकरण करणे अथवा न करणे, परवाना देणे अगर न देणे, हा सर्व प्रतिवादी क्र.२ च्या अखत्यारीतील विषय आहे. सदर व्यवसायास प्रतिवादी क्र.१ ने विद्युत पुरवठा केलेला आहे. वादीचा परवान्याचा कालावधी संपल्यानंतर दि.३१.०३.२०१० पासून तेथे करत असलेला व्यवसाय हा विनापरवाना आहे, ज्याबाबत हक्कज्ञापन वादी मागत आहे. दिनांक ३१.०३.२०१० पासून वादीने व्यवसायाचे नुतणीकरण करु का घेतले नाही त्याचा खुलासा अभिलेखावर नाही. वादीने संबंधीत अधिका–याकडे परवाना नुतणीकरणासाठी अर्ज केलेला नाही. जर हक्कज्ञापनाची व निरंतर मानाईचा अनुतोष वादीस दिला तर परवाना नुतणीकरणाशिवाय वादी व्यवसाय सुरु ठेवणार आहे व केवळ न्यायालयाच्या आदेशामुळे विनापरवाना व्यवसायास प्रतिवादी क्र.१ ला विद्युतपुरवठा करणे भाग पडेल. अशा स्वरुपात ऐच्छीक स्वरुपाची दाद देणे संयुक्तीक नाही. सबब मुद्दा क्र.२ व ३ बाबत माझा अभिप्राय नकारार्थी आहे.

**मुद्दा क्र.४ बाबतः**

१६. मुद्दा क्र.१ चा अभिप्राय होकारार्थी असला तरी मुद्दा क्र.२ व ३ बाबतचा अभिप्राय नकारार्थी आलेला आहे. त्यामुळे वादीचा दावा अमान्य करणे संयुक्तीक ठरेल. दाव्याचे स्वरुप लक्षात घेता उभय पक्षकारांनी दाव्याचा खर्च आपआपला सहन करणे संयुक्तीक ठरेल. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे;

# आ दे श

१. वादीचा दावा अमान्य करणेत येत आहे.

२. उभय पक्षकारांनी दाव्याचा खर्च आपआपला सोसणेचा आहे.

सही/-
(वि. रा. पाटील)
तिसरे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
सांगली.

सांगली.
तारीखः- १९/१०/२०१८